**बृहन्मुंबई महानगरपालिका**

बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालय व टो.रा.वैद्यकीय महाविद्यालय

डॉ. ए.एल. नायर रोड, मुंबई सेंट्रल, मुंबई-400 008

…………………..

क्र. टिएनटी/1986 दि.09.09.2024

**बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालय व टो. रा. वैद्यकीय महाविद्यालयात** Emergency Lab **साठी प्रयोगशाळा तंत्रज्ञ या संवर्गाची पदे कंत्राटी तत्वावर भरण्यासाठी जाहिरात.**

बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालय व टो. रा. वैद्यकीय महाविद्यालयात Emergency Lab साठी प्रयोगशाळा तंत्रज्ञ या संवर्गातील रिक्त पदे **एका वर्षाकरीता दर 40 दिवसानी एका दिवसाचा खंड देऊन** कंत्राटी तत्वावर भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव/वर्ग | रिक्त पदे |
|---|---|---|
| 1 | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | **18** |

**1) प्रयोगशाळा तंत्रज्ञ हया पदाकरिता**
**शैक्षणिक अर्हता-**

(अ) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाची विज्ञान शाखेतील(Degree in B.Sc.) पदवी धारण करणारा असावा अणि मान्यताप्राप्त विद्यापिठाची(Maharashtra State Board of Technical Education) ची /डी.एम.एल.टी. पदविका(Diploma in Medical Laboratory Technology) पदविका उत्तीर्ण झालेला असावा. (B.sc + DMLT)

**किंवा**

उमेदवाराने 12 वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांचेकडील निम वैद्यकीय तंत्रज्ञान या शाखेतील लॅबोरेटरी मेडिसीन या विषयातील(Bachelor of Paramedical Technology in Laboratory Medicine) पदवी धारण करणारा असावा.

(ब) उमेदवार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची शालांत परीक्षा वा तत्सम परीक्षा किमान 50 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.

(क) उमेदवारांना संगणकाचे ज्ञान अवगत करणे आवश्यक आहे. त्याने/तिने (डी.ओ.ई., ए.सी.सी.) सोसायटीचे (सी.सी.सी.) किंवा (ओ स्तर) किंवा (ए स्तर) किंवा (बी स्तर) किंवा (सी स्तर) स्तरावरील प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य आणि तांत्रिकी शिक्षण मंडळाचे एम.एस.सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी. चे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

Mahabharti.in

**वयोमर्यादा** – उमेदवारोचे वय 18 वर्षापेक्षा कमी व 33 वर्षापेक्षा जास्त असता कामा नये

**वेतनश्रेणी** – निश्चित वेतन दरमहा रु. 20000/- निश्चित (कोणताही भत्ता अनुज्ञेय नाही)

**निवडीचे निकष** – वरील शैक्षणिक अर्हते प्रमाणे प्राप्त केलेल्या गुणानुसार व मुलाखतीच्या गुणांनुसार निवड करण्यात येईल.

**<u>सर्वसाधारण अटी</u> :-**

1. कंत्राट तत्वावर भरण्यात येणारे प्रयोगशाळा तंत्रज्ञ पद नियमित स्वरुपातील नसून तात्पुरत्या स्वरुपात कंत्राट कालावधी करिता असेल.
2. पत्रव्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व व्यवस्थित असावा.
3. उमेदवारांनी अर्जासोबत शैक्षणिक अर्हता/व्यवसायिक अर्हता/संबंधित गुणपत्रिका प्रमाणित प्रत जोडावी.
4. निवड झालेल्या उमेदवाराने रुपये 500/- च्या मुद्रांक शुल्कावर बंधपत्र नियुक्तीच्या अगोदर देणे आवश्यक आहे.
5. कामकाजातील त्रुटी, कर्तव्यावरील अनुपस्थिती तसेच वागणूक आणि कार्यालयाकडे सादर केलेल्या करारनाम्याचा भंग केल्यास अथवा पालन न केल्यास कंत्राटी उमेदवारांची सेवा त्याचक्षणी तात्काळ समाप्त करण्यात येईल.
6. कंत्राटी पध्दतीने नियुक्त कर्मचा-यांना नियमित पदांकरिता असणारे कोणतेही फायदे मिळणार नाहीत. तसेच आवश्यकता नसल्यास त्यांची नियुक्ती कोणत्याही क्षणी संपुष्टात येईल.
7. कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या उमेदवारांची सेवा आवश्यकता वाटल्यास कधीही तसेच कोणतीही पूर्व सूचना न देता समाप्त करण्यात येईल
8. कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेल्या उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी भविष्यात हक्क सांगता येणार नाही. नियमित नियुक्तीच्या वेळी कंत्राटी तत्वावर केलेचे काम विचारात घेतले जाणार नाही.
9. पोस्टाच्या विलंबामुळे कोणतीही माहिती प्राप्त होण्यास किंवा कळविण्यास विलंब झाला तर त्याची जबाबदारी बृहन्मुंबई महानगरपालिकेची राहणार नाही.
10. नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त् करण्यात येईल.
11. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवड प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता, टो. रा. वैद्यकीय महाविद्यालय आणि बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालय यांनाआहेत.
12. निवड झालेल्या उमेदवाराना बा.य.ल.नायर धर्मा रुग्णालय व टो.रा.वैद्यकीय महाविद्यालयाच्या नियुक्त केलेल्या ठिकाणी तिन्ही पाळीत काम करणे बंधनकारक आहे.

Mahabharti.in

13. विहित नमुन्यात सर्व बाबींची पूर्तता केलेले अर्ज, अलिकडेच काढलेल्या पासपोर्ट आकाराचे छायाचित्र त्यावर चिकटवून अर्ज बा.य.ल. नायर धर्मा. रुग्णालय, डॉ. ए.एल.नायर रोड, मुंबई सेंट्रल,मुंबई– 400 008 यांच्या आवक-जावक कार्यालयात दि.11.09.2024 पासून दि.20.09.2024 पर्यंत सर्व शनिवार, रविवार आणि सर्व सार्वजनिक सुट्टया वगळून सादर करावेत. विहित दिनांक/ वेळेनंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत किंवा सदर बाबत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार स्विकारला जाणार नाही.

**<u>खालील कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित केलेल्या छायांकित प्रती सदर अर्जासोबत सादर कराव्यात.</u>**

1. आधार कार्ड
2. पॅन कार्ड
3. वास्तव्याचा पुरावा (आधार कार्ड/ पासपोर्ट/ वाहनचालक परवाना/ वीज देयक [बिल] / दुरध्वनी देयक [बिल])
4. ओळख पुरावा (आधार कार्ड/ वाहनचालक परवाना/ पारपत्र [पासपोर्ट] / मतदान ओळखपत्र)
5. माध्यमिक शालांत (एसएससी) परिक्षेची गुणपत्रिका
6. उच्च माध्यामिक (एचएससी) परिक्षेची गुणपत्रिका
7. पदवी परिक्षेची गुणपत्रिका आणि उत्तीर्ण प्रमाणपत्र (असल्यास)
8. डी.एम.एल.टी. पदविका उत्तीर्ण प्रमाणपत्र
9. दोन पासपोर्ट आकाराची अलिकडील काढलेली छायाचित्रे
10. शैक्षणिक अर्हता व अनुभव या संबंधित असलेले इतर कागदपत्रे.
11. अनुभव प्रमाणपत्र

सही/-

**अधिष्ठाता**

**टो. रा. वैद्यकीय महाविद्यालय**

Mahabharti.in

# बृहन्मुंबई महानगरपालिका
## अर्जाचा नमुना

**पदाचे नाव – कंत्राटी प्रयोगशाळा तंत्रज्ञ**

| |
|---|
| उमेदवाराने त्याचे<br>अलिकडे काढलेले<br>पारपत्र आकाराचे<br>छायाचित्र लावून<br>फोटोवर स्वाक्षरी करावी.<br>2.5 सेमी x 3 सेमी |

1) (अ) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) मराठीत : ----------------------------------------------------

(ब) वडिलांचे / पतीचे संपूर्ण नाव : --------------------------------------------------------------

(क) विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव (महिलाकरिता) : ---------------------------------------------------

2) पत्ता : ---------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------पिन कोड :---------

3) मोबाईल क्र.------------------------

4) लिंग : पुरूष : स्त्री :

5) (अ) जन्मदिनांक :

(ब) दिनांक- --------------- रोजी असलेले वय ---------- वर्ष ---------- महिने ---------- दिवस

6) शैक्षणिक अर्हता :

अ)

| शैक्षणिक अर्हता | विद्यापीठाचे नाव | गुणांचा तपशील | | |
|---|---|---|---|---|
| | | प्राप्त | पैकी | टक्केवारी |
| **बी.एस.सी. सायन्स** | | | | |
| **डी.एम.एल.टी.**<br>**3 वर्षाचा अभ्यासक्रम** | | | | |

ब)

| शैक्षणिक अर्हता | विद्यापीठाचे नाव | गुणांचा तपशील | | |
|---|---|---|---|---|
| | | प्राप्त | पैकी | टक्केवारी |
| **बारावी** | | | | |
| Bachelor of Paramedical Technology in Laboratory Medcine **पदवी** | | | | |
| | | | | |

क) एस.एस.सी. परीक्षेत मराठी विषय घेऊन् उत्तीर्ण आहे का ? होय/नाही (प्रमाणपत्र जोडावे)

ड) संगणकीय ज्ञान : MSCIT किंवा शासनाने विहित केलेल्या संगणक विषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र आहे/नाही.

सदर पदाच्या जाहिरातीतील नियम अटी व शर्ती मला मान्य आहेत.

दिनांक -

आपला /आपली विश्वासू

ठिकाण -

अर्जदाराची सही/-

**(अर्जदाराचे नांव)**